# कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना लि; अंकुशनगर

पो.अंकुशनगर, ता.अंबड, जि.जालना

दि.०१/०७/२०१७

## -: परिपत्रक :-

कर्मयोगी अंकुशनराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना लि, अंकुशनगर युनिट नं.१ व २ चे कार्यक्षेत्रातील (संपुर्ण अंबड व घनसावंगी तालुका आणि कारला विभाग) सर्व सभासद व बिगरसभासद ऊस उत्पादकांना कळविण्यात येते की, कारखान्याचे युनिट नं.१ व २ करिता गळीत हंगाम २०१८-१९ करिता ऊस गाळप क्षमतेनुसार १२.०० लाख मे.टन. ऊसाची आवश्यकता आहे. त्याकरिता आवश्यकतेनुसार चांगल्या प्रतीचा, सुधारीत जातीचा, जादा साखर उतारा देणारा परिपक्व ऊस गळीत हंगामाचे सुरवातीपासून मोठ्या प्रमाणावर उपलब्ध व्हावा म्हणून व एकरी ऊस उत्पादन वाढविणेचे दृष्टीने मा.संचालक मंडळाने खालील प्रमाणे ऊस लागवडीचे धोरण ठरविलेले आहे.

### (अ) हंगामनिहाय/जातनिहाय ऊस लागवड

| अ.क्र. | ऊसाची जात | लागवड हंगाम | लागवड कालावधी | तोडणी कालावधी (महिने) |
|---|---|---|---|---|
| १ | को-८६०३२, कोव्हीएसआय-९८०५, कोएम-०२६५ | आडसाली | माहे जुलै २०१७ ते सप्टें. २०१७ अखेर | १६ ते १७ (महिने) |
| २ | को-८६०३२, कोव्हीएसआय-०३१०२, कोव्हीएसआय-९८०५, व्हीएसआय-०८००५, एमएस-१०००१ | पुर्वहंगामी | माहे आक्टों. २०१७ ते डिसें. २०१७ अखेर | १४ ते १५ (महिने) |
| ३ | कोसी-६७१, व्हीएसआय-०८००५, एमएस-१०००१, को-८६०३२ | सुरु | माहे जाने. २०१८ ते मार्च २०१८ अखेर | १२ ते १४ (महिने) |

नियम व अटी

१. कारखान्यामार्फत बेणे/रोपे वाटप माहे जुलै २०१७ पासून सुरु करण्यात येईल.

२. माहे सप्टेंबर २०१७ नंतर कोएम-०२६५ जातीच्या ऊसाची लागवड केल्यास ऊसाची नोंद कारखाना व्यवस्थापनाचे परवानगीशिवाय घेण्यात येणार नाही.

३. ऊस रोपांपासुन लागवड केलेल्या ऊसाची नोंद लागवड तारखेच्या अगोदर ३० दिवस घेण्यात येईल.

४. ऊस लागवडीसाठी स्वत:बेणे/रोपे घेऊन लागवड केलेल्या ऊसाची नोंद त्वरीत करावी अन्यथा लागण फॉर्म भरलेली तारीखच ऊस नोंदीची तारीख धरण्यात येईल.

### (ब) उधारीने ऊस बेणे वाटप धोरण.

शिफारसीत/पुर्वप्रसारीत जातींचे कारखाना धोरणानुसार कार्यक्षेत्रातुन खाजगी ऊस बेणे घेऊन लागवड करतील अशा ऊस उत्पादकांना कारखाना प्रचलित धोरणाप्रमाणे विहित नमुन्यातील बेणे करारनामा कागदपत्रे घेऊन खालील नियोजनाप्रमाणे उधारीने बेणे वाटप करण्यात येईल.

| अ.क्र. | ऊसाची जात | ऊस बेणे प्रति मे.टन. |
|---|---|---|
| १ | को-८६०३२, कोव्हीएसआय-९८०५, कोव्हीएसआय-०३१०२, कोसी-६७१ | कारखान्याचे गाळप हंगाम-२०१७-१८ चे ऊस खरेदी दराप्रमाणे बेणे दर अदा करण्यात येईल. |
| २ | एमएस-१०००१, व्हीएसआय-०८००५ | कारखान्याचे गाळप हंगाम-२०१७-१८ चे ऊस खरेदी दरापेक्षा प्रति मे.टन. रु.५००/- प्रमाणे अतिरिक्त बेणे दर अदा करण्यात येईल. |

* प्रति एकर ऊस बेणेमळा संवर्धन/ऊस लागवडीसाठी को.८६०३२, व्ही.एस.आय.९८०५, व्ही.एस.आय.०३१०२, कोसी.६७१ *या वाणांचे २.००० मे.टन बेणे उधारीवर वाटप करण्यात येईल.*
* एमएस.१०००१ व व्ही.एसआय.०८००५ या ऊस वाणाचे प्रती एकर ऊस लागवडीसाठी १.५ मे.टन बेणे उधारीने वाटप करण्यात येईल.
* ऊस रोपांचे साहाय्याने लागवडीसाठी-एकरी ५००० नग रोपांचा ५०% उधारीने पुरवठा करण्यात येईल.
* ऊस रोपे खरेदीचा दर प्रती रोप व्ही.एस.आय.०८००५ साठी रु.३.५० एमएस.१०००१ साठी रु.३.२५, तसेच को.८६०३२ साठी रु.२.५० प्रमाणे लाभार्थी शेतकऱ्यांचे शेतापर्यंत पोहोच दराने राहील.
* संबंधीत बेणे मागणीदार शेतकऱ्यांनी कागदपत्राची पुर्तता केल्यानंतर व बेणे वाटप झाल्यानंतर उधार बेणे विक्री येणे रक्कम त्यांचा ऊस गाळप हंगाम २०१८-१९ मध्ये गाळपास अथवा बेणेस आल्यानंतर ऊस बिलातुन अथवा त्यांचा ऊस गाळपास न आल्यास त्यांचे जामीनदारांचे ऊस बिलातुन कारखाना प्रचलित व्याजासह प्राधान्याने कपात करण्यात येईल.
* उधारीने ऊस बेणे/रोपे खरेदी करणाऱ्या कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादकांनी ऊस बेणे करारनाम्याव्यतिरिक्त त्यांचे स्वत:चे बँक खात्याचे CTS चेक सोबत देणे आवश्यक राहील.

**क) ऊस रोपांनी बेणेमळा लागवड योजना.**

कारखाना कार्यक्षेत्रात जास्तीत-जास्त ऊस उत्पादकांचे क्षेत्रावर एमएस-१०००१, व्हीएसआय-०८००५ व को-८६०३२ या ऊस जातीच्या बेणेमळ्याची लागवड लागण हंगाम २०१७-१८ मध्ये वाढविणेचे दृष्टीने खालील प्रमाणे धोरण ठरविण्यात आलेले आहे.

१. बेणेमळा योजनेत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या सभासद शेतकऱ्यांची कारखान्याकडे गाळप हंगाम २०१७-१८ करिता ऊस नोंद असणे आवश्यक राहील.
२. बेणेमळा ऊस लागवडीसाठी ५ फुट अंतरावर सऱ्या सोडून २ फुट अंतरावर ऊस लागवड करणे बंधनकारक राहील.
३. योजनेतील सहभागी शेतकऱ्यांनी उत्तम दर्जाचा बेणेमळा वाढविणेसाठी पुर्वमशागत, खत व्यवस्थापन, पाणी, रोग व किड व्यवस्थापन या तांत्रिक बाबीचे माहितीपत्रकाप्रमाणे तंतोतंत पालन करणे आवश्यक राहील.
४. ऊस बेणेमळा लागवड ही एक डोळा टिपरी किंवा स्वत: लाभार्थ्याने ऊस रोपे निर्मिती करुन करावयाची आहे. त्यासाठीचे तांत्रिक मार्गदर्शन कृषिमदतनीस मार्फत संबंधित शेतकऱ्यांना करण्यात येईल.
५. रोपे निर्मितीसाठी आवश्यक पॉली ट्रे, कोकोपीट, बेणे, किटकनाशके, बुरशीनाशके इत्यादी व्यवस्था लाभार्थी शेतकऱ्याने स्वत: करावयाची आहे.
६. बेणेमळा लागवडीस/रोपे निर्मितीसाठी आवश्यक ऊस बेणे कारखाना धोरणाप्रमाणे उधारीने देणेत येईल.

तरी सर्व ऊस उत्पादकांनी वरीलप्रमाणे ऊस लागवड व बेणेमळा संवर्धन कार्यक्रमाची कार्यक्षेत्रात सक्षमरित्या अंमलबजावणी करुन कारखान्यास सहकार्य करावे हि विनंती.

**कार्यकारी संचालक** | **उपाध्यक्ष** | **अध्यक्षा**

**व**

**मा.संचालक मंडळ**

अक्षरदीप प्रिंटर्स, अंबड